नियमित दिवाणी दावा क्र. २३/२०१९
अर्जुन वि. मनुबाई

**निशाणी क्र. ३२ वरील आदेश**
(पारित दिनांक २७.०६.२०२२)

प्रस्तुतचा अर्ज वादी तर्फे सादर करण्यात येवुन वादी क्र. ४ नारजा भिकु गावीत हा दिनांक ०३/११/२०२१ रोजी मयत झाला असुन त्याचे वारस अभिलेखावर घेणेचा अर्ज मंजुर झाला आहे परंतु मुदतीत निशाणी क्र. १ वर दुरुस्ती करुन सदर वारस अभिलेखावर घेणेस व सुधारीत वाद पत्र देणेस विलंब झाला आहे. त्यामुळे तशी परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सादर करुन सदरचा अर्जास आक्षेप घेतला आहे. उभय पक्षकारांचे विद्ववान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुत प्रकरणात अभिलेखांचे अवालोकन केले असता निशाणी क्र. २८ वर वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज दिनांक २४/०३/२०२२ रोजी मंजुर होऊन १४ दिवसात तशी दुरुस्ती करावी असा आदेश पारित झाला आहे परंतु आदेश पारित झाल्यानंतर मुदतीत त्या अनुषंगाने वादीने आवश्यक ती सुधारणा/ दुरुस्ती अद्यापर्यंत केलेली नाही. प्रतीवादींचा आक्षेप स्वीकारण्याजोगा आहे असे असले तरी प्रकरण तांत्रीक बाबी पेक्षा गुणवत्तेवर निकाली काढणे न्याय आहे. त्याच प्रमाणे अभिलेखावर नमुद सर्व पक्षकारांना नैसर्गिक न्याय तत्वानुसार संधी देवुन त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. प्रकरणात वादी यांचे मुळे झालेल्या विलंबाकरिता प्रतिवादीस नुकसान भरपाई देता येणेही शक्य आहे. एकंदरीत सर्व बाबींचा विचार करता पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. वादी यांचा अर्ज प्रतिवादीस प्रत्येकी ५०/– रुपये नुकसान भरपाई पुढील तारखेपर्यंत देण्याचे अटीवर मंजुर करण्यात येतो.
२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत मुळ वादपत्रात निशाणी क्र. २८ चे आदेशाप्रमाणे दुरुस्ती करुन तसे सुधारीत वादपत्र अभिलेखावर सादर करावे.

सही/–xx
**(पंकज रा. फुलारी)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर.,
नवापुर.

दिनांक २७.०६.२०२२